06 MAR 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षणशास्त्र अधिविभागात विज्ञान दिन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात राष्ट्रीय विज्ञान दिन विविध उपक्रमांसह साजरा करण्यात आला. 'वूमन इन सायन्स : कॅटलायझिंग विकसित भारत' या विषयावर अधिविभागातील विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा, पोस्टर प्रदर्शन आणि सायन्स एस्केप कृती आदी उपक्रम राबविण्यात आले.

यावेळी डॉ. विद्यानंद खंडाळे, अधिविभागप्रमुख डॉ. चेतना प्र. सोनकांबळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. समन्वयक डॉ. रूपाली संकपाळ यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. राजनंदिनी व कॅनैन रझा यांनी सूत्रसंचालन केले. निशांत कुमार यांनी आभार मानले. यावेळी डॉ. सुप्रिया पाटील, सरस्वती कांबळे, सारिका पाटील, डॉ. अंजली गायकवाड, डॉ. विजय सदामते, आनंद कुंभार, श्रद्धा तांडेल, साबिया बागवान, सुश्मिता देब, अजय तरंगे, महादेव लोंढे, किशोर पाटील, किरण पाटील, शिक्षक, संशोधक व विद्यार्थी उपस्थित होते.

0 6 MAR 2026
लोकमत

# अलोक जत्राटकर यांच्या पुस्तकाला पुरस्कार

**कोल्हापूर :** येथील शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ.आलोक जत्राटकर यांच्या 'ब्लॅक, व्हाईट अन् ग्रे' या ललित लेखसंग्रहाला महाराष्ट्र साहित्य परिषद (पुणे) यांच्या ईश्वरपूर शाखेतर्फे देण्यात येणारा लोकनेते राजारामबापू पाटील उत्कृष्ट वाङ्मय-२०२५ पुरस्कार जाहीर झाला आहे. राजारामबापू पाटील ज्ञानप्रबोधिनीचे अध्यक्ष प्रा.शामराव पाटील, शाखेचे अध्यक्ष प्रा.दीपक स्वामी यांनी या पुरस्कारांची घोषणा केली. हा ललित लेखसंग्रह कोल्हापूरच्या भाग्यश्री प्रकाशनने प्रकाशित केला आहे. यामध्ये निवडक ३० लेखांचा समावेश आहे. डॉ.रणधीर शिंदे यांची प्रस्तावना आहे.

06 MAR 2026

पुढारी

# विद्यार्थ्यांना समजेल त्याच भाषेत शिकवावे : शिंदे

कोल्हापूर : शिक्षकांनी विद्यार्थ्यांना समजेल त्या भाषेमध्ये शिकविणे व उपयुक्त संशोधने करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे राज्यपाल नियुक्त सदस्य सिध्दार्थ शिंदे यांनी केले. शिवाजी विद्यापीठ शिक्षणशास्त्र अधिविभागामध्ये दोन दिवसीय राष्ट्रीय परिसंवादात ते बोलत होते. डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटीचे कुलगुरू प्रा.डॉ.आर.के कामत म्हणाले, सर्वसमावेशक शिक्षण राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा आधारस्तंभ आहे. शिक्षणामध्ये समावेशकतेची गरज आहे. यावेळी प्रा.डॉ.अजय साळी यांनी मार्गदर्शन केले. डॉ.चेतना सोनकांबळे यांनी स्वागत केले. समन्वयक डॉ.विद्यानंद खंडागळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ.रुपाली संकपाळ यांनी आभार मानले.

06 MAR 2026 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समाजकार्याचा विद्यार्थी शाश्वत विकासाचे बीज

## सिद्धार्थ शिंदे; विद्यापीठाच्या ग्रामीण मूल्यमापन शिबिराचा समारोप

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ५ : समाजकार्याचा प्रत्येक विद्यार्थी हा शाश्वत विकासाचे बीज असून, आपल्या परिसराच्या विकासामध्ये भरीव योगदान देण्यासाठी सक्षम असावा, अशी अपेक्षा शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे राज्यपाल नियुक्त सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी केले.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या समाजकार्य विषयाच्या विद्यार्थ्यांच्या ग्रामीण मूल्यमापन शिबिराच्या समारोपवेळी सिद्धार्थ शिंदे यांच्यासमवेत अमोल मिणचेकर, मंजुषा मोहिते आदी उपस्थित होते.

मौजे जाम्बरे व मजरे शिरगाव (ता. चंदगड) येथे विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटच्या समाजकार्य विभागातर्फे २३ ते २७ फेब्रुवारी या कालावधीत सहभागी ग्रामीण मूल्यमापन शिबिर घेण्यात आले. यात २८ विद्यार्थ्यांनी शिबिर समन्वयक डॉ. अमोल मिणचेकर व मंजुषा मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली गावाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक आणि पर्यावरणीय परिस्थितीचा सखोल व वस्तुनिष्ठ अभ्यास केला. शिबिराचा उद्देश विद्यार्थ्यांना ग्रामीण जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव देणे तसेच ग्रामस्थांच्या सहभागातून विकासाच्या गरजा ओळखणे हा होता. या शिबिराच्या समारोपावेळी शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. पाणी व्यवस्थापन सुधारणा, कौशल्य विकास प्रशिक्षण, महिला उद्योजकतेला चालना, पर्यावरण संवर्धन उपक्रम आणि शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी यावर विशेष भर देण्यात आला. त्यासाठी प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, स्कूलचे संचालक डॉ. नितीन माळी यांचे मार्गदर्शन लाभले.

### गावांतील समस्यांचे विश्लेषण

या शिबिरादरम्यान मोबिलिटी मॅपिंग, सामाजिक नकाशा, संसाधन नकाशा, समस्या वृक्ष, कालबदल तक्ता आणि लक्षकेंद्री गट चर्चा या विविध साधनांचा वापर करण्यात आला. या प्रक्रियेतून मौजे जाम्बरे व मजरे शिरगाव गावांतील पाणीटंचाई, बेरोजगारी, शेतीतील घटते उत्पन्न, युवकांचे स्थलांतर, महिलांच्या मर्यादित हालचाली आणि पर्यावरणीय समस्या यांचे मूळ कारणांसह विश्लेषण करण्यात आले.

06 MAR 2026

तरुण भारत

# शिक्षणशास्त्र अधिविभागात विज्ञान दिन साजरा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात राष्ट्रीय विज्ञान दिन विविध उपक्रमांसह साजरा करण्यात आला. 'वूमन इन सायन्सः कॅटलायझिंग विकसित भारत" या विषयावर अधिविभागातील विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा, पोस्टर प्रदर्शन आणि सायन्स एस्केप कृती आदी उपक्रम राबविण्यात आले. यावेळी डॉ. विद्यानंद खंडाळे, अधिविभाग प्रमुख डॉ. चेतना प्रा. सोनकांबळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. समन्वयक डॉ. रुपाली संकपाळ यांनी स्वागत केले. राजनंदिनी व कॅनैन रझा यांनी सूत्रसंचालन केले. निशांत कुमार यांनी आभार मानले. यावेळी डॉ. सुप्रिया पाटील, सरस्वती कांबळे, सारिका पाटील, डॉ. अंजली गायकवाड, डॉ. विजय सदामते, आनंद कुंभार, श्रद्धा तांडेल, साबिया बागवान, सुश्मिता देब, अजय तरंगे, महादेव लोंढे, किशोर पाटील, किरण पाटील आदी उपस्थित होते.

0 6 MAR 2026

तरुण भारत

# विद्यापीठात ग्रंथपालन व्यवसाय राष्ट्रीय परिषद आजपासून

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

'कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात ग्रंथपालन व्यवसायाचे भवितव्य" या विषयावर आज शुक्रवारपासून (दि. ६) शिवाजी विद्यापीठात दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळी ११ वाजता शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, महाराष्ट्र विद्यापीठे आणि महाविद्यालयीन ग्रंथपाल संघटनेचे अध्यक्ष डॉ. मोहन खेरडे, कोल्हापूर विभागाचे उच्चशिक्षण सहसंचालक डॉ. प्रकाश बच्छाव यांच्या उपस्थितीत परिषदेचे उद्घाटन होणार आहे. सचिव डॉ. विनय पाटील अध्यक्षस्थानी असतील. परिषदेला उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. धनंजय सुतार, डॉ. सचिनकुमार पाटील, डॉ. प्रकाश बिलावर यांनी केले आहे.

0 6 MAR 2026

पुढारी

# विद्यापीठात 'ग्रंथपालन व्यवसायाचे भवितव्य' विषयावर आजपासून दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर :** 'कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात ग्रंथपालन व्यवसायाचे भवितव्य' या विषयावर शुक्रवारपासून (दि. ६) शिवाजी विद्यापीठात दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र विद्यापीठे व महाविद्यालयीन ग्रंथपाल संघटना, शिवाजी विद्यापीठ शाखा, विद्यापीठाचे बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात होणार आहे. शुक्रवारी सकाळी ११ वाजता प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, महाराष्ट्र विद्यापीठे आणि महाविद्यालयीन ग्रंथपाल संघटनेचे अध्यक्ष डॉ. मोहन खेरडे, कोल्हापूर विभागाचे उच्चशिक्षण सहसंचालक डॉ. प्रकाश बच्छाव यांच्या प्रमुख उपस्थितीत परिषदेचे उद्घाटन होईल. ग्रंथपाल संघटनेचे सचिव डॉ. विनय पाटील अध्यक्षस्थानी असतील. परिषदेला ग्रंथपालांनी उपस्थित राहावे, असे आवाहन ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. सचिनकुमार पाटील, उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर यांनी केले आहे.

0 6 MAR 2026

पुण्यनगरी

# 'ग्रंथपालन' विषयी आजपासून राष्ट्रीय परिषद

**कोल्हापूरः प्रतिनिधी**

'कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात ग्रंथपालन व्यवसायाचे भवितव्य' या विषयावर शुक्रवार, दि. ६ पासून शिवाजी विद्यापीठात दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र विद्यापीठे आणि महाविद्यालयीन ग्रंथपाल (मुकला) संघटना, शिवाजी विद्यापीठ शाखा, विद्यापीठाचे बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित परिषद शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात होईल.

सकाळी ११ वाजता शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, महाराष्ट्र विद्यापीठे आणि महाविद्यालयीन ग्रंथपाल



(मुकला) संघटनेचे अध्यक्ष डॉ. मोहन खेरडे, कोल्हापूर विभागाचे उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. प्रकाश बच्छाव यांच्या प्रमुख उपस्थितीत परिषदेचे उद्घाटन होईल. 'मुकला'चे सचिव डॉ. विनय पाटील अध्यक्षस्थानी असतील, अशी माहिती ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. सचिनकुमार पाटील, उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर यांनी केले आहे.

0 6 MAR 2026 जनप्रवास
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अण्णासाहेब लठ्ठे खरे लोकशिक्षक



- 'आण्णासाहेब लठ्ठे जीवन आणि कार्य'वर प्राचार्य आनंद मेणसे यांचे प्रतिपादन
- स्व. दिवाणबहाद्दूर आण्णासाहेब लठ्ठे स्मृती व्याख्यानमाला

**जनप्रवास : कोल्हापूर**

शाहूकार्याशी बांधिलकी आणि गांधीविचारांशी निष्ठा अशा मुशीतून घडलेले दिवाणबहादूर अण्णासाहेब लठ्ठे हे एक महत्त्वाचे लोकशिक्षक होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य आनंद मेणसे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे राजर्षी शाहू लोकविद्या आणि लोकसंस्कृती अभ्यास केंद्र, मराठी अधिविभाग आणि इतिहास अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्व. दिवाणबहाद्दूर अण्णासाहेब लठ्ठे स्मृती व्याख्यानमालेमध्ये 'आण्णासाहेब लठ्ठे:जीवन आणि कार्य'या विषयावर ते बोलत होते. कुलसचिव डॉ. विलास शिंदे अध्यक्षस्थानी होते, तर सांगलीच्या लठ्ठे एज्युकेशन सोसायटीचे सचिव सुहास पाटील प्रमुख उपस्थित होते.

प्राचार्य मेणसे यांनी आपल्या भाषणात प्रोफेसर लठ्ठे यांनी कोल्हापूरसह बेळगाव परिसरात केलेल्या विविधांगी कार्याची सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले, लठ्ठे यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची सामाजिक, राजकीय, शैक्षणिक भूमिका पटलेली होती. विशेषतः कोल्हापूरमध्ये त्यांनी जैन विद्यार्थ्यांसाठी स्थापन केलेल्या स्वतंत्र वसतिगृहाच्या कृतीमुळे ते प्रभावित झाले होते. या माध्यमातून ते महाराजांच्या अधिक जवळ आले. त्यांच्या विचारकार्याशी त्यांनी अखेरपर्यंत बांधिलकी सांभाळली. त्याचप्रमाणे महात्मा गांधी यांनी काँग्रेसच्या बेळगाव अधिवेशनात अस्पृश्यता निवारण, दलित आणि महिलांचे प्रश्न विषयपत्रिकेवर घेतल्यामुळे ब्राह्मणेतर चळवळीतील अन्य मंडळींसह लठ्ठेही त्यांच्यासमवेत उभे राहिले. गांधींच्या श्रमप्रतिष्ठेच्या विचाराचे ते पाईक होते.

अध्यक्षीय मनोगतात कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, आण्णासाहेब लठ्ठे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू आहेत. छत्रपती शाहू महाराजांच्या चरित्रासह त्यांनी अनेक महत्त्वाची पुस्तके लिहिली. त्यांचे वाचन करणे महत्त्वाचे आहे. यावेळी सुहास पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर सुखदेव एकल यांनी आभार मानले.

कार्यक्रमाला डॉ. अशोक चौसाळकर, सुरेश शिपूरकर, डॉ. अनिल गवळी, शरद गायकवाड, रफिक सूरज, गोमटेश्वर पाटील, अक्षय सरवदे, शिवकुमार सोनाळकर, सुभाष पाटील यांच्यासह शिक्षक, संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते

0 6 MAR 2026 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्कूल ऑफ इंजिनिअरिंगकडे शिवस्पंदनचे जेतेपद

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात नुकत्याच पार पडलेल्या शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सवामध्ये विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीने सलग चौथ्या वर्षी सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. क्रीडा अधिविभाग दुसऱ्या तर फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी तिसऱ्या क्रमांकाचे मानकरी ठरले. पोलीस अधीक्षक योगेशकुमार गुप्ता यांच्या हस्ते विजेत्या संघांचा व खेळाडूंचा गौरव करण्यात आला.

शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सव स्पर्धा २४ ते २८ फेब्रुवारी या कालावधीत शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुल येथे झाल्या. यामध्ये कॅम्पसवरील सुमारे अडीच हजार विद्यार्थी सहभागी झाले होते. बुधवारी स्पर्धेतील अंतिम सामने झाले. स्पर्धेच्या पुरस्कार वितरण समारंभाला विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, स्वागत परुळेकर, अमित कुलकर्णी प्रमुख उपस्थित होते. क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. एन.डी. पाटील यांनी सूत्रसंचालन केले, तर किरण पाटील यांनी आभार मानले.



पोलीस अधीक्षक योगेशकुमार गुप्ता यांच्याकडून चषक स्वीकारताना स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचा संघ.

## स्पर्धेचा सविस्तर निकाल असा

- क्रिकेट (पुरुष): स्कूल ऑफ इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजी (विजेतेपद), रसायनशास्त्र, फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी (उपविजेतेपद), यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट (तृतीय)
- क्रिकेट (महिला): क्रीडा आधिविभाग, रसायनशास्त्र, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, गणित.
- थ्रो बॉल (महिला): फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी, वाणिज्य व व्यवस्थापन, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल अँड डेव्हलपमेंट, प्राणीशास्त्र.
- व्हॉलीबॉल (पुरुष): स्कूल ऑफ इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजी, वनस्पतीशास्त्र, क्रीडा,
- बुद्धिबळ (पुरुष): आदित्य सावळकर (क्रीडा), अनिकेत धोतुरे (स्कूल ऑफ इंजिनिअरिंग), अपूर्व कदम (स्कूल ऑफ इंजिनिअरिंग)
- बुद्धिबळ (महिला): प्रतीक्षा गोसावी (स्कूल ऑफ इंजिनिअरिंग), सुरभी सिंग (स्कूल ऑफ इंजिनिअरिंग), नेहा कटके (स्कूल ऑफ इंजिनिअरिंग).
- बॅडमिंटन (पुरुष): स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, अर्थशास्त्र, स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी.
- बॅडमिंटन (महिला): नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी, संगणकशास्त्र.



शिवाजी विद्यापीठाच्या शिवस्पंदन क्रीडा स्पर्धेत उपविजेतेपद मिळविणारा क्रीडा अधिविभागाचा संघ

- रस्सीखेच (महिला): क्रीडा, फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी, गणित, शिक्षणशास्त्र.
- रस्सीखेच (पुरुष): शिक्षणशास्त्र, पर्यावरणशास्त्र, क्रीडा.
- ॲथलेटिक्स पुरुष आणि महिला गटात सर्वसाधारण विजेते अनुक्रमे: क्रीडा, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, मराठी.

06 MAR 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ' स्कूल ऑफ इंजि.'ला 'शिवस्पंदन'चे सर्वसाधारण विजेतेपद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात नुकत्याच पार पडलेल्या शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सवामध्ये विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीने सलग चौथ्यांदा सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. क्रीडा अधिविभाग दुसऱ्या, तर फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी तिसऱ्या क्रमांकाचे मानकरी ठरले. कोल्हापूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक योगेश कुमार गुप्ता यांच्या हस्ते पुरस्कार वितरण समारंभ पार पडला.

शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सव स्पर्धा २४ ते २८ फेब्रुवारी या कालावधीत शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुल येथे झाल्या. यामध्ये कॅम्पसवरील सुमारे अडीच हजार विद्यार्थी सहभागी झाले.

स्पर्धेचा सविस्तर निकाल अनुक्रमे असा : क्रिकेट (पुरुष) : स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, रसायनशास्त्र, फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट.

क्रिकेट (महिला): क्रीडा अधिविभाग, रसायनशास्त्र, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, गणित.

थ्रो बॉल (महिला): फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी, वाणिज्य व व्यवस्थापन, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल अँड डेव्हलपमेंट, प्राणीशास्त्र.



कोल्हापूर : पोलीस अधीक्षक योगेश कुमार गुप्ता यांच्याकडून विजेतेपदाचा चषक स्वीकारताना स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचा संघ.

व्हॉलीबॉल (पुरुष): स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, वनस्पतीशास्त्र, क्रीडा,

बुद्धिबळ (पुरुष): आदित्य सावळकर (क्रीडा), अनिकेत धोतुरे (स्कूल ऑफ इंजिनिअरिंग), अपूर्व कदम (स्कूल ऑफ इंजिनिअरिंग).

बुद्धिबळ (महिला): प्रतीक्षा गोसावी (स्कूल ऑफ इंजिनिअरिंग), सुरभी सिंग (स्कूल ऑफ इंजिनिअरिंग), नेहा कटके (स्कूल ऑफ इंजिनिअरिंग).

बॅडमिंटन (पुरुष): स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, अर्थशास्त्र, स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी.

बॅडमिंटन (महिला): डिपार्टमेंट ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी, संगणकशास्त्र.

रस्सीखेच (महिला) : क्रीडा, फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी, गणित, शिक्षणशास्त्र.

रस्सीखेच (पुरुष) : शिक्षणशास्त्र, पर्यावरणशास्त्र, क्रीडा.

अॅथलेटिक्स पुरुष आणि महिला गटांत सर्वसाधारण विजेते अनुक्रमे : क्रीडा, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, मराठी.

स्पर्धेच्या पुरस्कार वितरण समारंभाला विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, स्वागत परुळेकर, अमित कुलकर्णी प्रमुख उपस्थित होते. क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. एन. डी. पाटील यांनी सूत्रसंचालन केले, तर किरण पाटील यांनी आभार मानले.

06 MAR 2026
तरुण भारत

# आण्णासाहेब लठ्ठे महत्वाचे लोकशिक्षक : प्रा. मेणसे

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शाहू कार्याशी बांधिलकी आणि गांधी विचारांशी निष्ठेतून घडलेले दिवाणबहादूर आण्णासाहेब लठ्ठे हे एक महत्त्वाचे लोकशिक्षक होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य आनंद मेणसे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे राजर्षी शाहू लोकविद्या आणि लोकसंस्कृती अभ्यास केंद्र, मराठी अधिविभाग आणि इतिहास अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्व. दिवाणबहादूर आण्णासाहेब लठ्ठे स्मृती व्याख्यानात 'आण्णासाहेब लठ्ठेः जीवन आणि कार्य' या विषयावर ते बोलत होते. कुलसचिव डॉ. विलास शिंदे अध्यक्षस्थानी होते, तर सांगलीच्या लठ्ठे एज्युकेशन सोसायटीचे सचिव सुहास पाटील उपस्थित होते.

प्राचार्य मेणसे म्हणाले, लठ्ठे यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची सामाजिक, राजकीय, शैक्षणिक भूमिका



बोलताना प्रा. आनंद मेणसे.

पटलेली होती. जयंती नदीवरील पूल, बेळगावच्या राजकीय, शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकासामध्येही त्याचा महत्वाचा वाटा आहे. १९३७ मधील पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत बेळगाव उत्तरमधून लठ्ठे विजयी झाले आणि मुंबई प्रांताचे पहिले अर्थमंत्रीही झाले. त्यांनी सादर केलेला अर्थसंकल्प आदर्शवत होता.

कुलसचिव डॉ. विलास शिंदे, सुहास पाटील यांनी मनोगत केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी स्वागत केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 6 MAR 2026
पुढारी

# अण्णासाहेब लठ्ठे महत्त्वाचे लोकशिक्षक

## प्राचार्य आनंद मेणसे; शिवाजी विद्यापीठात लठ्ठे स्मृती व्याख्यानमाला




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित अण्णासाहेब लठ्ठे स्मृती व्याख्यानमालेत बोलताना प्राचार्य आनंद मेणसे. मंचावर (डावीकडून) सुहास पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे. (छाया: पप्पू अत्तार)**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शाहू कार्याशी बांधिलकी आणि गांधी विचारांशी निष्ठा अशा मुशीतून घडलेले दिवाणबहादूर अण्णासाहेब लठ्ठे हे एक महत्त्वाचे लोकशिक्षक होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य आनंद मेणसे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे राजर्षी शाहू लोकविद्या आणि लोकसंस्कृती अभ्यास केंद्र, मराठी अधिविभाग आणि इतिहास अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दिवाणबहादूर अण्णासाहेब लठ्ठे स्मृती व्याख्यानमालेमध्ये 'अण्णासाहेब लठ्ठे : जीवन आणि कार्य' या विषयावर ते बोलत होते. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे अध्यक्षस्थानी होते, सांगलीच्या लठ्ठे एज्युकेशन सोसायटीचे सचिव सुहास पाटील प्रमुख उपस्थित होते.

प्राचार्य मेणसे म्हणाले, लठ्ठे यांना राजर्षी शाहू महाराज यांची सामाजिक, राजकीय, शैक्षणिक भूमिका पटली होती. विशेषतः कोल्हापूरमध्ये त्यांनी जैन विद्यार्थ्यांसाठी स्थापन केलेल्या स्वतंत्र वसतिगृहाच्या कृतीमुळे ते प्रभावित झाले होते. या माध्यमातून ते महाराजांच्या अधिक जवळ आले. त्यांच्या विचारकार्याशी त्यांनी अखेरपर्यंत बांधिलकी सांभाळली.

अध्यक्षीय मनोगतात कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, 'अण्णासाहेब लठ्ठे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू आहेत. शाहू महाराजांच्या चरित्रासह त्यांनी अनेक महत्त्वाची पुस्तके लिहिली. त्यांचे वाचन करणे महत्त्वाचे आहे.'

यावेळी सुहास पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

यावेळी ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, सुरेश शिपूरकर, डॉ. अनिल गवळी, डॉ. शरद गायकवाड, डॉ. रफिक सूरज, डॉ. गोमटेश्वर पाटील, डॉ. अक्षय सरवदे, डॉ. शिवकुमार सोनाळकर, डॉ. सुभाष पाटील उपस्थित होते.

06 MAR 2026

पुढारी



कोल्हापूर : क्रिकेट स्पर्धेच्या उपविजेत्या संघासोबत मान्यवर.

# क्रिकेट : शिवाजी विद्यापीठ संघ उपविजेता

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ येथे आयोजित महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाने उपविजेतेपद पटकावले.

स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील १७ विद्यापीठ संघांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठ कर्मचारी क्रिकेट संघ सहभागी झाला होता. तीन साखळी सामन्यांमध्ये अनुक्रमे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, यंशवतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक व महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर संघांचा पराभव करून शिवाजी विद्यापीठ संघाने उपांत्य फेरीत प्रवेश केला. उपात्य फेरीमध्ये शिवाजी विद्यापीठ कर्मचारी क्रिकेट संघाने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम फेरीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचा बरोबर झाला. अंतिम सामना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांना प्रथम क्रमांक पटकवला व शिवाजी विद्यापीठ कर्मचारी क्रिकेट संघास द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. शरद बनसोडे, संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण यांनी प्रास्ताविक केले. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी शिवाजी विद्यापीठ कर्मचारी क्रिकेट संघास पुढील स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या.